नि.फौ.ख.क्र. १२८/२०२२
सरकार वि.श्रीकृष्ण
नि.क्र.२४

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची जबानी.**

देवाची शपथ खरे सांगतो की,

माझे नांव – सुनिता भानुदास चिमकर,

माझे वय – ४७ वर्षे, धंदा – मजुरी

राहणार – वाडी माहळुंगी, ता. नांदुरा, जि. बुलढाणा.

– – – – –

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी वकील श्री.बी.व्ही. वाहूरवाघ यांच्यामार्फत**

मी आरोपीला ओळखते. घटनेच्या वेळी आरोपी हा गावाचा उपसरपंच होता. घटना एप्रिल महिन्याच्या एक तारखेला तीन वर्षापुर्वी घडली होती. घटना सन २०२३ मध्ये घडली होती. मी निरीक्षक आहे मला वर्षाबाबत समजत नाही. घटनेच्या वेळी सकाळी ०६.३० वाजता शेतामध्ये हरभरा सोंगण्याकरीता जात होती. आरोपी हा माझ्या मागे शेतापर्यंत आला होता. त्यानंतर दोन ते तीन दिवस एकसारखा आरोपी सोनोने यांच्या दुकानापर्यंत माझ्यामागे आला. आरोपी मला म्हणाला की, माझे सोबत लग्न कर, मी त्यास नकार दिला कारण मला दोन मुले आहे. त्यानंतर एप्रील महिन्याच्या १० तारखेला मी घरी असतांना आरोपी माझ्या घरामध्ये आला. आरोपी वाईट उद्देशाने माझ्या घरात आला होता. त्यावेळी तो जास्त माझ्या अंगलट आला, त्याने माझी साडी ओढताण केली, त्यानंतर तो पळुन गेला. मी घटनेचा रिपोर्ट दिला होता. मला आता फिर्याद व छापील खबर दाखविण्यात आली, त्यावर माझा निशाणी अंगठा आहे, त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क्र.२५ व नि.क्र.२६** देण्यात येतो. १० तारखेच्या घटनेच्या वेळी माझे पती दवाखान्यात गेले होते. घटनेची फिर्याद उशीरा दिली कारण आरोपीने मला, माझ्या पतीला व मुलांना मारण्याची धमकी दिली होती. पोलीसांनी माझी वैद्यकीय तपासणी केली होती. घटनेच्यावेळी पोलीस आले होते. न्यायालयाध्ये माझा जबाब कलम १६४ नुसार नोदविण्यात आला, त्यास नि.क्र.२७ देण्यात येतो. मी आरोपीला ओळखते तो आज रोजी न्यायालयात हजर आहे. घटनेच्या वेळी माझे घर माझ्या पतीच्या नावे होते.

**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री.पी.एस.मुऱ्हे यांच्यामार्फत**

२.            हे म्हणणे खरे आहे की, माझ्या कुटुंबामध्ये मी, माझे पती, सासु व दोन मुले एकत्र राहतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी माझे एकत्र  कुटुंब होते. घटनेच्या दिवशी मी हरभरा सोंगण्याकरीता माहळुंगी येथे अमोल डिवरे यांचे शेतात चालली होती. त्यावेळी आमच्या गावामधील पाच महिला माझ्या सोबत होत्या, त्यांची नावे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, इतर महिला आरोपीला ओळखत होत्या. मी घटना शेतमालक यांना सांगीतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, ०१ तारखेच्या घटनेची फिर्याद मी पोलीस स्टेशनला लगेच दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीकडे माहळुंगी शिवारात शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, अमोल डिवरे यांच्या शेताकडे आरोपीचे शेत आहे.

३.            आरोपीने सोनोने यांच्यादुकानाजवळ मला दोन ते तीन वेळा आडविले होते त्याची तारीख एप्रिल महिन्यामधील ४,५,६ अशी आहे. हे म्हणणे खरे आहे की, ४,५,६ तारखेची फिर्यादी मी लगेच पोलीस स्टेशनला दिली नाही. साक्षीदार सांगते की, सर्व घटनेची फिर्यादी मी १४ एप्रिल रोजी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे घराच्याबाजुला अंगणवाडी, किराणा दुकान, रामचंद्र धुरंधरयांचे घर व इतर लोकांची घरे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर गावामधील मुख्य रस्त्यावर आहे. मी पोलीसांना जबाब देतांना सांगीतले होते की, मला दोन मुले आहेत, मी तुझ्या सोबत लग्न करु शकत नाही, आरोपीने माझी साडी ओढताण केली होती, १० तारखेला माझे पती दवाखान्यात गेले होते. मला आता माझा जबाब वाचुन दाखविला सदरील बाबी माझ्या जबाबात का नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

४.            हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी आरोपीचे लग्न झालेले होते. शिवाजी चिमकर माझा दिर आहे. सन २०२१ मध्ये माझ्या गावामध्ये निवडणुक झाली असता माझे दिर व आरोपी एकाच वार्डात एकमेकाविरुध्द उभे होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या निवडणुकीमध्ये माझ्या दिराचा पराभव झाला व माझे दिर हरले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर आरोपी गावचा उपससरंपच झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२१ निवडणुकीपासुन आमचे व आरोपीचे सबंध चांगले नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी माझी सासु घरामध्ये हजर

होती. साक्षीदार सांगते की, घटनेच्या वेळी माझी सासु आंधळी, बहिरी व लंगडी होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी माझा मुलगा व मुलगी आम्ही एकत्र राहत होतो. हे म्हणणे खरे आहे की, सोनोने यांचे किराण दुकान माझ्या घरासमोर लागुनच आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरील किराणा दुकानासमोर असल्यामुळे लांब जाण्याची गरज नसते.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सोबत माझे प्रेमसंबंध होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीस लग्न करण्याबाबत म्हणत असे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मला म्हणाला होता की आपण दोघे विवाहीत आहोत आपल्याला लग्न करण्याचे योग्य होणार नाही, तरी सुध्दा मी आरोपीला लग्न करण्याकरीता आग्रह करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीचे जवाई मुरलीधर इंगळे यांना मी ओळखते. हे म्हणणे खरे नाहीकी, माझ्या प्रेमसंबंधाबाबत माझ्या माहेरी माहित होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईची अशी इच्छा होती की माझे लग्न आरोपी सोबत करावे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या सोबत लग्न करण्यास नकार दिला म्हणून सदरची खोटी तक्रार दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, ०१.०४ रोजी व दि.१०.०४ रोजी सरतपासामध्ये सांगीतल्याप्रमाणे कुठलीही घटना न घडल्यामुळे, मी घटनेची फिर्याद ताबडतोब दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर मुख्य रस्त्यवर असलयामुळे माझ्या घरात कोण येते जाते हे लोकांना दिसते. हे म्हणणे खरे आहे की, सोनोने यांच्या दुकानावर ग्राहकांची गर्दी असते. माझ्या गावात पाटील असुन ते माझ्या सामाजाचे नाही. मी त्यांना ओळखते. मी आरोपीच्या त्रासाबाबत पोलीस पाटील यांना सांगीतले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगीतल्याप्रमाणे कोणतीही घटना न घडल्यामुळे मी आरोपी विरुध्द लगेच फिर्याद दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, गावामध्ये आमच्या चिमकर परीवाराचे खुप लोक असुन त्यामध्ये राजकारणामध्ये असलेले लोक आहे. हे म्हणणे खरे नाही की, गावामधील चिमकर लोकांशी माझे पटते.हे म्हणणे खरे आहेकी, माझ्या घरामध्ये मोठयाने आवाज केल्यास रस्त्यावर ऐकु येते. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगीतल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सोबत प्रेमसंबंध असल्यामुळे व मी आरोपीस लग्नास विचारले होते व त्याने नकार दिला त्यामुळे खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझे दिर निवडणुकीमध्ये पडल्यामुळे सुध्दा आरोपी विरुध्द खोटा रिपोर्ट दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला धमक्या दिल्यामुळे मी उशीरा रिपोर्ट दिला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.२७ वरील खोटे बयाण

न्यायालयात दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

RAVINDRA ASHOK MISAL

Digitally signed by RAVINDRA ASHOK MISAL
Date: 2025.01.24 11:10:57 +0530

नांदुरा.		(रविंद्र अ.मिसाळ)

दिनांक – २३.०१.२०२५.		न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,नांदुरा.

मी खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील पुरावा हा मुळ पुराव्याप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :– | मनोज गजानन देशपांडे, |
| न्यायालयाचे नांव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालय नांदुरा. |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २४.०१.२०२५ |